**महाराष्ट्र लोकसेवा आयोग** **(जाहिरात क्रमांक - २३/२०१७)**

सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक संयुक्त (पूर्व) परीक्षा-२०१७ मधील

# विक्रीकर निरीक्षक पदाचा निकाल घोषित

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. १६ जुलै, २०१७ रोजी सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, पोलीस उपनिरिक्षक **संयुक्त** (पूर्व) परीक्षा-२०१७ घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेमधून **विक्रीकर निरीक्षक पदाचा निकाल दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी जाहीर करण्यात आला आहे. विक्रीकर निरीक्षक** पदाकरिता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे विक्रीकर निरीक्षक मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी. मुख्य परीक्षा दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी घेण्यात येईल.**

**३.** प्रस्तुत निकालाआधारे विक्रीकर निरीक्षक मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विषयांकित गट-ब पदासाठी विहित केलेली खेळविषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा अहवाल प्राप्त करणे अनिवार्य राहील. तद्नुषंगाने संबंधित खेळाडू उमेदवारांनी त्यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्राची विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेकडून तातडीने पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे.

**४.** प्रस्तुत निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवारांनी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**विजया पडते**
**उप सचिव (परीक्षा-१)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**

दि. १२ ऑक्टोबर, २०१७